# भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची भूमिका व भारतीय शेतीसमोरील आव्हाने

**प्रा. वाघमारे दत्ता मनोहरराव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, आष्टी,
ता.परतुर, जि.जालना

## प्रस्तावना (Introduction)

शेतीमध्ये अत्याधुनिक ज्ञान, तंत्रज्ञानाचा वापर केला जात असला तरी नैसर्गिक, मुक्त वातावरणात शेती केली जाते. वातावरणातील बदलाचा परिणाम शेतीवर, पिकांवर चांगला किंवा वाईट स्वरूपाचा होतो. पर्यावरण व वातावरण हे एकमेकांशी संलग्न आहेत. शेती व्यवसाय वाढ किंवा पिकांची वाढ होण्यासाठी, अधिक उत्पादन मिळवण्यासाठी पर्यावरण समृद्ध असले पाहिजे. कमी खर्चात अधिकाधिक उत्पादन मिळण्यासाठी चांगले पर्यावरण असणे ही बाब प्रकर्षाने जाणवू लागली आहे. त्यासाठी गावोगावी पर्यावरणाचे रक्षण करणे हे शेती क्षेत्रासाठी व सर्वांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण बाब आहे.

## भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची भूमिका

1. **राष्ट्रीय उत्पन्न** :- देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नावरून राष्ट्राच्या आर्थिक विकासाची कल्पना येते. राष्ट्रीय उत्पन्ना वरुन देशातील सर्वसामान्य लोकांचे राहणीमान उच्चदर्जाचे आहे की नाही याची माहिती मिळते. राष्ट्रीय उत्पन्नात देशातील सर्व क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पादनाची बेरीज केली जाते. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा वाटा अधिक आहे. देशाच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनात शेतीक्षेत्राचा वाटा सन २०११-१२ मध्ये १३.०९ % होता. सन २०१७-१८ मध्ये तो १७.३२% इतका झाला आहे.
2. **अन्नधान्याचा पुरवठा** :- मानवाची अन्नधान्याची मुलभूत गरज शेतीक्षेत्रातून भागवली जाते. अन्नाची मुलभूत गरज भागवून जनतेला सुस्थितीत ठेवण्याचे कार्य कृषी क्षेत्रामार्फत केले जाते. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागवण्यासाठी शेती क्षेत्राचे अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे.
3. **रोजगार निर्मिती** :- मानवाला चरितार्थासाठी रोजगार उपलब्ध असणे आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा मुख्य आधार आहे. लोकसंख्येच्या सर्वात मोठ्या गटाचा तो व्यवसाय आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीचे साधन म्हणून शेतीचे महत्त्व अधिक आहे.

4. **औद्योगिक विकासास उपयुक्तता** :- औद्योगिक विकासाच्या दृष्टीने शेतीचे महत्त्व अधिक आहे. कृषी क्षेत्रामार्फत विविध उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा केला जातो. उदाहरणार्थ साखर उद्योगांना ऊस, कापड गिरण्यांना कापूस, तेल गिरण्यांना तेलबिया, टायर्स आणि ट्यूब तयार करण्याचा उद्योगांना नैसर्गिक रबर, इत्यादी. त्यामुळे अनेक उद्योगांमधील उत्पादन कृषी क्षेत्राकडून मिळणाऱ्या कच्च्या मालावर अवलंबून असते.
5. **आर्थिक नियोजनात महत्त्व** :- देशाचा आर्थिक विकास घडवूनकृषी पर्यावरण आणण्यासाठी आणि सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आर्थिक नियोजन महत्त्वाचे असते. भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. त्यामुळे नियोजनाचे यशापयश शेती या व्यवसायावर अवलंबून असते. शेतीतून उत्पादन झाले तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते. कृषीवर आधारित उद्योगांना कच्चामाल उपलब्ध होऊन आर्थिक विकास होतो. त्यामुळे आर्थिक नियोजनात शेतीचे स्थान महत्त्वाचे आहे.
6. **आंतरराष्ट्रीय व्यापारातील महत्त्व** :- भारताच्या परकीय व्यापारात कृषी क्षेत्राचे महत्त्व आहे. पूर्वीपासूनच भारत चहा, कॉफी, साखर, तंबाखू, केळी, सुती कपडे, वनस्पती तेल, इत्यादी नैसर्गिक पारंपरिक वस्तूंची निर्यात करत आहे. अलीकडे कृषी वस्तूंच्या आयात-निर्यातीचे आकारमान विस्तारले आहे. जागतिक स्तरावर भारत हा जगातील प्रमुख १५ कृषी वस्तूंच्या निर्यातक देशांमध्ये मोडतो.
7. **सार्वजनिक आयव्ययात महत्त्वाचे स्थान** :- सार्वजनिक आयव्यय म्हणजे सरकारचे उत्पन्न व खर्चाचे विवरण होय. जमीन महसुलाच्या माध्यमातून सरकारला उत्पन्न मिळते. तसेच सरकारच्या अंदाजपत्रकीय खर्चामध्ये शेती व्यवसायाचा विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो. उदाहरणार्थ जलसिंचन सुविधा, साठवण व्यवस्था वगैरेसाठी सार्वजनिक खर्च केला जातो.
8. **ग्रामीण जनतेच्या राहणीमानात सुधारणा** :- ग्रामीण जनतेला ग्रामीण भागात उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून राहावे लागते. शेती व्यवसाय निसर्गाच्या कृपेवर अवलंबून आहे. शेतकरी, कारागीर, छोटे व्यवसायिक यांचे उत्पन्न शेतीवर अवलंबून असते. शेतीचा विकास झाला तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या राहणीमानाच्या दर्जा मध्ये सुधारणा होते.
9. **शहरी समस्या सोडवण्यास मदत** :- ग्रामीण भागात चरितार्थाचे साधन शेती असते. शेती व्यवसायाशिवाय रोजगार उपलब्ध नसल्याने लोक शहरी भागात रोजगारासाठी जातात. त्यामुळे शहरी भागात लोकसंख्येत वाढ होऊन विविध समस्या निर्माण होतात. शहरांमध्ये राहण्याच्या जागेचा प्रश्न, पाणीपुरवठा, वाहतूक, सामाजिक यासारख्या

समस्या निर्माण होतात, शहरातील समस्या सोडवण्यासाठी शेती क्षेत्राचा विकास व ग्रामीण भागात रोजगार निर्मिती केल्यास मदत होते

10. **आर्थिक विकासास मदत** :- आर्थिक विकास ही व्यापक संकल्पना आहे. आर्थिक विकासामध्ये वृद्धि बरोबरच राष्ट्रीय उत्पन्नाच्या वितरनातील बदल, वास्तव उत्पन्न, दारिद्र्य, बेरोजगारी, उत्पन्नाचे वितरण इत्यादी मध्ये काय बदल होतो याचा विचार केला जातो. शेती क्षेत्राच्या विकासामुळे उद्योगांना आवश्यक असणारा कच्चामाल उपलब्ध होतो. तसेच देशातील वाहतूक, दळणवळण, वित्तपुरवठा इत्यादी क्षेत्राच्या विकासासाठी मदत होऊन देशाचा आर्थिक विकास होतो.

अशा प्रकारे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान स्पष्ट केले आहे.

## भारतीय शेतीपुढील आव्हाने (Challenges to Indian Agriculture)

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मानवाच्या मूलभूत गरजा याच व्यवसायातून भागवल्या जातात. त्यामुळे मानवी जीवनात शेती व्यवसायाचे महत्त्व कमी झालेले नाही. भारतीय शेतीची उत्पादकता प्रगत देशांच्या मानाने कमी आहे. औद्योगिक क्रांतीमुळे शेती उत्पादनाला मागणी वाढली आहे. भारताच्या विदेशी व्यापारात एकूण निर्यातीत शेती क्षेत्राचा वाटा अधिक आहे. परंतु भारतीय शेतीपुढे अनेक आव्हाने किंवा अडथळे आहेत ते पुढील प्रमाणे.

- **उत्पादकता (Productivity)**

उत्पादकता म्हणजे शेत जमिनीची उत्पादन करण्याची क्षमता किंवा शक्ती होय. शेतीची उत्पादकता म्हणजे दर हेक्टरी मिळणारे उत्पादन होय. शेतीच्या उत्पादकतेसाठी शेतीतील उत्पादन, शेतजमीन इ.चा. विचार केला जातो. शेतीची उत्पादकता दोन पद्धतीने मोजता येते.

➢ **प्रति हेक्टरी उत्पादकता** :- शेत जमिनीमध्ये होणाऱ्या एकूण उत्पादनाला त्या जमिनीच्या क्षेत्रफळाने भागले असता दर हेक्टरी उत्पादकता मिळते.

➢ **प्रति श्रमिक उत्पादकता** :- शेतजमिनीमधील उत्पादन व त्यासाठी वापरलेल्या एकूण श्रमिकांची म्हणजेच शेतमजुरांची संख्या यांचे गुणोत्तर म्हणजे प्रति शेतमजुरांची उत्पादकता होय. भारतीय शेती मधील सर्वात मोठे आव्हान म्हणजे कमी उत्पादकता होय. विकसित राष्ट्रांच्या मानाने भारतीय शेतीची उत्पादकता तुलनेत कमी आहे.

भारतीय शेतीमधील सर्वात मोठे आव्हान म्हणजे कमी उत्पादकता होय. विकसित राष्ट्रांच्या तुलनेत भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे. भारतातील बरीचशी शेतजमीन १ हेक्टरपेक्षा कमी आहे. भारतातील बरीचशी शेतजमीन कोरडवाहू असल्याने उत्पादकता अल्प आहे. शेती अजूनही ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.

**भारतातील शेतीच्या उत्पादकते बाबतची आव्हाने**

1) **शेतीवर अवलंबून असणारी वाढती लोकसंख्या** - भारताची लोकसंख्या सतत वाढत आहे. या लोकसंख्येला सामावून घेण्याची क्षमता उद्योग व सेवा क्षेत्रात निर्माण न झाल्याने वाढती लोकसंख्या शेती क्षेत्राकडे आकर्षिली जाऊन शेतीवर भार टाकते. लोकसंख्या वाढीबरोबर धारण क्षेत्राचा आकार कमी होऊन या क्षेत्रातील बेकारी वाढली आहे.

2) **सेवा सुविधांचा अभाव** - शेतीची उत्पादकता कमी असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीला कर्जपुरवठ्याच्या सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. शेतमाल बाजारपेठेपर्यंत वाहून आणण्यासाठी वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध नाहीत. शेतमाल साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा आहेत.

3) **उत्पादन पद्धती** - धारण क्षेत्राचा अतिशय लहान आकार आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हलाखीची असते. यामुळे बहुतांशी लहान शेतकरी शेतीसाठी पारंपरिक पद्धतीचा वापर करतात. आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी लागणारे रासायनिक खते व संकरित बियाणे महागडी असल्याने गरीब शेतकऱ्यांना परवडत नाहीत. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने शेती केल्यामुळे उत्पादकता कमी आहे

4) **जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा** - भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याचे कारण म्हणजे जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा होय. स्वातंत्र्योत्तर काळात जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली असण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी जलसिंचनात वाढ करणे आवश्यक आहे.

5) **शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा** - शेतकऱ्यांना आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. मुलांचे शिक्षण, आजारपण विविध कारणासाठी कर्ज घेतले जाते.

**संदर्भसुची :-**

1) भारतीय आर्थिक पर्यावरण – डॉ. आर. जी. रसाळ, प्रा. एस. पी. आढाव प्रा. के. घोटेकर

2) व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता – डॉ. आर. जी. रसाळ, डॉ. अरूण येवले, डॉ. आर.पी. कळमकर, डॉ. बी. डी. रणपिसे